ं. ठाणे
काव्य
१५५०



# मराठी शायरी

REFBK-0012721
REFBK-0012721

## वा. वा. पाटणकर

किंमत दोन रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...३२०३५... वि: ...०१७५...
क्रमांक ...१५५०... नों: दि: ...२-२०-६२

# म रा ठी  शा य री

REFBK-0012721
REFBK-0012721

—वा. वा. पाटणकर

प्रकाशक :
बा. वा. पाटणकर
वकील
यवतमाळ

मुद्रक :
ब्रह्मानंद नाडकर्णी
संजय प्रेस,
डहाणूकर एस्टेट,
तुळसी पाईप रोड,
दादर, मुंबई-२८

पर्शियन–उर्दू भाषेंतील काव्यप्रकार
मराठींत प्रथम आणणारे कवि
" कै. माधव ज्यूलियन "
यांचे स्मृतीस सादर समर्पण

–वा. वा. पाटणकर

अनुक्रम 32037 वि: ३१०५
क्रमांक 2440 नों दि: २/५६८
92029

# उर्दू शायरीचा ढंग

आधुनिक मराठी कवितेच्या जन्मकाळीं तिच्यापुढें फक्त एकच पर्याय होता ही मला दुर्दैवाची गोष्ट वाटते. तो पर्याय म्हणजे इंग्रजी कवितेच्या वळणावर जाण्याचा. माझें हें मत आणि ' केशवसुतांनीं इंग्रजीचें अनुकरण करण्यापलीकडे कुठचीच बहादुरी केली नाहीं ' हें मत, ही दोन्ही एक नव्हेत हें मला येथें बजावून सांगितलें पाहिजे. जुन्या संतांच्या परमार्थवादी परंपरेंतून आणि जुन्या पंडित कवींच्या शब्दालंकारवादी परंपरेंतून बाहेर पडण्याची ऊर्मि खऱ्याखुऱ्या कवींना इंग्रजी शिक्षणानंतर होणें अपरिहार्य होतें. जें झिडकारायचें तें ठरलें होतें; जें व्यक्त करायचें तें तर अंतःकरणांत उसळतच होतें. परंतु तें ज्या तऱ्हेनें व्यक्त करायचें ती ठरण्याला मात्र इंग्रजी काव्यवासनानें विशिष्ट वळण लागलें.

ऐहिक जीवनाचा ठराविक आणि अप्रामाणिक धिक्कार करीत बसायला, केशवसुतादि कवी अर्थातच तयार नव्हते. व्यक्तीच्या ऐहिक आकांक्षांचा धिक्कार फार काळ झाला होता. त्याची प्रतिक्रिया म्हणून जीवितवादी, निसर्गपूजक, आत्मपूजक कविता उसळून येणें अपरिहार्य होते. मराठी शाहिरांनीं जुन्या अप्रामाणिक निवृत्तीविरुद्ध थोडेफार बंड केलें होतें; पण एक तर या शाहिरांना नैसर्गिक कामनांना उद्गार देण्याइतका धीटपणा असला, तरी आपलीं ऐहिकपर गीतें घेऊन परमार्थवादी कवींच्या मांडीला मांडी लावून बसण्याइतकें शिक्षण आणि संस्कृति नव्हती. या न्यूनगंडामुळेंच त्यांनीं वेदांताच्या खोट्या कोलांट्या घेऊन दाखवणाऱ्या भेदिक लावण्या लिहिण्याचें सोंग केलें.

विरक्ति ही काव्याच्या दरबारांतली सर्वश्रेष्ठ भावना नसून 'अनुरक्ति' हीच सर्वश्रेष्ठ भावना आहे, हें केशवसुतादि रोमँटिक--सौंदर्यवादी--कवींनींच ओळखलें व धीटपणें उद्घोषित केलें. या त्यांच्या सौंदर्यपूजक स्फुरणाच्या काळीं त्यांच्यासमोर दोनच वाटा होत्या. एक तर इंग्रजी रोमँटिक कवींच्या सुरांत गायचें; नाहीं तर जुन्या खेडवळ असंस्कृत लावणीकारांच्या पंक्तीला बसायचें. अर्थात् केवळ फॅशन् म्हणून विरक्तीचीं, स्त्रीनिंदेचीं आणि देहनिंदेची गाणीं गात बसण्यापेक्षां त्यांनीं असंस्कृत डफ–तुणतुणेवाल्यांच्या पंक्तीला बसणें देखील पत्करलें असतें. कारण त्यांना संभावितपणापेक्षांहि प्रामाणिकपणा आणि भावनापूजन प्रिय होतें.

पण केशवसुत, टिळक, तांबे, गोविंदाग्रज यांच्यासारख्या प्रामाणिक भावनापूजकांना कालमानामुळें आणखी कांहीं गुण चिकटले. ते गुण म्हणजे सुधारणावाद आणि प्रयोगवाद. " जें आगरकरांनी व चिपळूणकरांनीं गद्यांत सांगितलें, तेंच केशवसुतांनीं पद्यांत सांगितलें," ही त्यांच्या काव्याची फलश्रुति सांगणारे बहाद्दर टीकाकार आहेतच. शैलीचे, वृत्तांचे आणि काव्यप्रकारांचे प्रयोग करीत बसणें हें फार मोठें कार्य आहे, अशी केशवसुतांच्या पुढच्या पिढीची--रविकिरणमंडळाची–समजूत होतीच. पण सुधारणावाद आणि प्रयोगवाद हे केशवसुतकालीन काव्याचे विशेष नसून, भावनांचा प्रामाणिकपणा हा त्याचा विशेष होता असें मी मानतों. आणि या दृष्टीनें पाहतां, आधुनिक मराठी कविता आपलें जुनें, संकुचित आणि अप्रामाणिक वळण सोडून धाडसानें घराबाहेर पडली, तेव्हां तिला सोबत आणि वाटाडी फक्त इंग्रजी कविता होती हें मी दुर्दैव समजतों.

आधींच इंग्रजी कवितेवर सहज आणि कर्णमधुर आत्माविष्कारापेक्षां बौद्धिकतेचें ओझें; त्यांतच आमच्या इंग्रजीशिक्षित कवींच्या काळीं सभोंवतीं राजकीय सामाजिक पुनरुत्थानाचें वातावरण! त्यामुळें पुष्कळदां त्यांना वैयक्तिक भावनांच्या आविष्कारांपेक्षां, समाजोद्धाराच्या आरोळ्या अधिक प्रतिष्ठित वाटत! आणि हीच त्यांची समजूत तांब्यांच्यासारख्या जातिवन्त चंडोलाला खटकत असे. केशवसुतांच्या रूढिभंजनाच्या आवेशांना काव्यानुकूल मानायला तांबे कधींच तयार नसत. वास्तविक त्या काळच्या हिंदुस्थानांत कवितेला

इंग्रजीखेरीज दुसरी कोणीच सोबतीण नव्हती असें नव्हे. रविन्द्रबाबूंची कविता नव्या वळणाची असून इंग्रजी वळणाची आहे असें म्हणतां येणार नाहीं. पण ऐहिकपूजक असूनहि इंग्रजीपासून स्फूर्ति न घेणारी हिंदुस्थानमधील दुसरी कविता म्हणजे उर्दू शायरी होय. मराठी कविता परंपरेच्या जड जोखडाशीं हिसकाहिसकी करीत असताच तिच्या दृष्टीसमोर उर्दू शायरीसारखी, सुंदर, नाजूक, आणि नखरेल, आत्मपूजक, प्रेमपूजक कविता असती, तर तिला कोणतें वळण लागलें असतें तें तांबे व माधव ज्यूलियन् यांच्या कांहीं कवितांतील कांहीं ढंगावरून ओळखतां येण्यासारखें आहे.

वास्तविक जो वेगळा प्रवाह मराठींत आल्याने मराठी कवितेचा ढंग अधिक मनोहर झाला असता, तो प्रवाह माधव ज्यूलियन् या कवीला माहीत होता. फारशी उर्दूतील कित्येक आकर्षक भूमिका, वृत्ति व आविष्कार-पद्धति माधवराव पटवर्धनांच्या गझलांत ठिकठिकाणीं चमकून जातात. त्यांच्या कवितेतील फारशी ढंगाचा एक महत्त्वाचा संप्रदाय होऊंहि शकला असता. कांहीं तरुण कवींनीं माधवरावांच्या कवितेंतील इष्काचे, शैलीचे व लयीचे अनुकरण केलेंदेखील. परंतु मराठींत अल्पकाळ लहरून गेलेल्या या फारसी-उर्दू घराण्याचा उस्तादच स्वतः त्या घराण्याशीं पुरता इमानदार नव्हता ! उत्कट आणि उदार प्रेम हें माधवरावांचें स्वतःचेच होतें; परंतु त्या प्रेमाचा दिलदार दरबारी अविष्कार त्यांनीं केवळ सक्तीच्या फारसी वाचनांतून मिळवला होता. हृदयांत इष्क फारसी कवींचें; पण डोक्यांत काव्य-कल्पना मात्र संस्कृत पंडितांची ! असें माधवरावांचें विच्छिन्न व्यक्तिमत्त्व होतें. एवढ्यांतूनही जीवनाच्या एका आर्त आणि ध्येयपूजक कालखंडांत त्यांनीं कांहीं सुंदर गझल ( किंवा गझलांचे तुकडे ) लिहून टाकले. पण काव्याच्या व्याख्येंत भावनेसंबंधानें वर्डस्वर्थ यानें योजलेले 'Recollected in tranquility' हे शब्द प्रत्यक्ष काव्यलेखनाच्या क्षेत्रांत आमचे माधवराव 'Recorrected in tranquility' असा फेरफार करून आपल्या डोळ्यासमोर ठेवीत असत ! आणि जे स्फूर्तीच्या आवेगांत लिहिलें, तें स्फूर्तिशून्य फुरसतींत 'रफू' करीत बसत ! फारसी इष्क आणि संस्कृत अलंकारशास्त्र, यांचा हा संकर—विवाह निपुत्रिक ठरला, हें सांगावयास नकोच ! तथापि माधवराव पटवर्धन यांनींच फारसी उर्दूचा ढंग मराठींत

प्रथम आणला, हें खोटें नाहीं.

बुझावूं मी किती तूंतें करावी मी किती हांजी
कितीदां मंत्र उच्चारूं तुझा मी, तूंहि हो माझी

× × ×

हें सावज जाईल भिऊनी न पळूनी
आकर्ण धनुष्यें तर कां व्यर्थ तयारी ?

× × ×

प्राशितो सौंदर्य तूझें मी दुरूनी
प्राशुनी पियूष कां जातो झुरूनी ?

× × +

वरील ओळींसारख्या ओळी जातकुळीने मराठीपेक्षां अगदीं वेगळ्या आहेत, हें कोणाहि मर्मज्ञास सहज लक्षांत येण्यासारखें आहे. उर्दू-फारसीतील प्रेमाविष्कार संस्कृत शृंगारापेक्षां तर वेगळा आहेच; पण इंग्रजी प्रेमकवितेपेक्षांही वेगळा आहे. त्या प्रेमाविष्कारांत एक प्रकारची निर्वाणी व विव्हलता असूनहि दैन्य नसतें; प्राणार्पणाची तयारी असली, तरी नैराश्य नसतें. कल्पनेचा खेळ असतो, नव्हे—शब्दांचा देखील खेळ असतो; परंतु भावनेची उत्कटता कुठेंही कमी नसते. शब्दांची निवड नाजुक आणि मुलायम असते व एका विशिष्ट लयींत शब्दयोजना झाल्यामुळें संगीतानुकूलताहि अपूर्व येते.

हा सर्व सरंजाम आमच्या रोखठोक मराठी भाषेंत उपलब्ध नसूनहि फारसी-उर्दूच्या ढंगानें लिहिलेल्या मराठी कविता वेगळ्या उठून दिसतात, असें आढळून येईल. या गोष्टीचा प्रत्यय पुणेंकर रसिकांना गेल्या मे महिन्यांत एका अद्‌भुत काव्यगायनाचे वेळीं आला. अद्‌भुत म्हणण्याचें कारण एवढेंच कीं, पुण्यांत काव्यगायनें अनेक होतात. क्वचित् उर्दू कवींचे मुशायरेहि होतात. पण उर्दू ढंगांत लिहिलेले मराठी ' शेर '— आणि तेहि त्या ढंगांत पुरेपूर मुरलेल्या यवतमाळच्या एका विद्वान, पोक्त वयाच्या कवीनें

म्हटलेले ऐकण्याचा योग पुण्याच्या श्रोत्यांना यापूर्वी कधींच आला नसेल. हें अपूर्व काव्यगायन करायचें योजलें त्यावेळीं परिषदेचा 'कार्याध्यक्ष' या नात्यानें मला त्याच्या यशाविषयीं बरीच साशंकता वाटत होती. याचें कारण काव्याविषयींची वा कवीविषयींची साशंकता नव्हे; तर श्रोत्यांच्या साद देण्याच्या शक्तीसंबंधीं साशंकता हें होय. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे, या मराठी 'शायरीला' पुणेंकर रसिकांनीं इतकी सहजस्फूर्त साद दिली कीं, उर्दू मुशायऱ्याचीच आठवण व्हावी! उर्दू कवितेचें व मुशायिऱ्याचें मर्म कशांत आहे? उर्दू ढंगाच्या रचनेला व काव्यगायनाला महाराष्ट्रीय रसिक साद देईल कीं नाहीं, याची शंका का वाटावी? मराठी कवितेला केशवसुतांपासून आत्मनिष्ठा लाभली असली, तरी आत्मनिष्ठेंतील आत्मविस्मृति लाभलेली नाहीं. उर्दूच्या थाटांत 'शेर' लिहायचे, म्हणजे मनुष्य स्वतःच्या सुखदुःखांत आकंठ बुडलेला असूनहि स्वतःविषयीं बेभान असावा लागतो. यालाच इंग्रजींत 'Abandon' असें म्हणतात. हा बेभानपणा, ही बेहोषी, मराठींत तांबे यांच्याखेरीज कोणाहि कवींत नव्हती.

जी स्थिति काव्यलेखनाची तीच काव्यगायनाची. आधुनिक मराठी कवि 'रविकिरण' कालीन कवींप्रमाणें गुणदर्शन म्हणून (Performance म्हणून) सम्मेलनप्रसंगीं अंग सावरून उभ्या असलेल्या षोडशवर्षेप्रमाणें तरी गाईल, नाहीं तर सजवलेल्या उद्दामपणानें गाणाऱ्या आजच्या नवकवींप्रमाणें (Studied impertinence नें) तरी गाईल! पण तल्लीनपणा, प्रेमळपणा आणि बेभानपणा यांचें खऱ्या कवीला शोभेसें मिश्रण एक तांब्यांच्या काव्यगायनांत तरी आढळे, नाहीं तर उर्दू कवींच्या मुशायऱ्यांत तरी आढळते. रविकिरणमंडळाच्या घोटीव रचनेला आणि समारंभात्मक गायनाला कंटाळल्याचा बहाणा करणाऱ्या नवकवींना उर्दू कवितेचा व काव्यगायनाचा एक वेगळाच नमुना मानवला नाहीं, ही गोष्ट अर्थपूर्ण आहे. फार काय. रमणीय उदार दरबारी इष्कानें नटलेले कित्येक गझल लिहून झाल्यावर (नव्हे, अर्धेच लिहिल्यावर!) माधवराव पटवर्धन 'विरहतरंगा' सारख्या प्रसाद-शून्य कसरतीकडे वळले, आणि अखेर, नकुलालंकारासारख्या किचकट आणि औपरोधिक रचनेंत त्यांच्या प्रतिभेचा अन्त झाला, ही गोष्ट

देखील अर्थपूर्ण आहे. व्यक्तिस्वातंत्र्यवादाच्या आणि ऐहिकतापूजनाच्या इंग्रजी जमान्यांत, आमच्या कवींत आत्मनिष्ठा उदय पावली असली, तरी तिचा विकास बे-दरकार आत्मपूजनापर्यंत होऊं शकला नाहीं. केशवसुतांत या बेपर्वा आत्मपूजनाची बीजें होतीं; पण ज्या सामाजिक जाणिवेचें कौतुक, १९३५ ते १९४५ मधील मार्क्सपूजक टीकाकारांनीं केलें, त्या सामाजिक जाणिवेनेंच केशवसुतांना ' कवि ' या नात्यानें असलेल्या दुर्दम्य अहंकाराचें विलिनीकरण केलें ! सामाजिक जाणीव असलेला कवि, व्हावा तितका बेभान आणि बेहोष होऊं शकत नाहीं, हेंच केशवसुतांच्या उदाहरणांवरून सिद्ध होतें. नाहींतर–

' आम्हांला वगळा गतप्रभ झणीं होतील तारांगणें '

× × ×

आम्ही नव्हतों आमुचे बाप ! कशास हा मग पश्चात्ताप ? ॥

× × ×

यांसारख्या दुर्दम्य आत्मविश्वासाच्या आणि बेपर्वाईच्या ओळी लिहिणाऱ्या कवीचा विकास वेगळ्याच दिशेनें झाला असता.

यवतमाळ येथील वकील श्री. भाऊसाहेब पाटणकर यांचें नांव पुण्यांतील काव्यवाचकांना गेल्या मे महिन्यापर्यंत ठाऊक नव्हतें. आणि निसर्गानें त्यांना काव्यप्रेमाबरोबरच जर उमदा चेहेरा आणि ' दिलेर ' वृत्ति ( हा त्यांचाच लाडका शब्द आहे ! ) दिली नसती, तर त्यानंतर आजतागायतहि बहुधा माहीत झालें नसतें. परंतु गेल्या मे महिन्यांत एके दिवशीं महाराष्ट्रराज्यकवि श्री. यशवंत यांचेकडून मला एका मराठी कवीचें, उर्दू मुशायिऱ्याच्या धर्तीवरचें काव्यगायन करण्यासंबंधीं पृच्छा करण्यांत आली. मी स्वतः उर्दू काव्याचा भोक्ता असलों, तरी मराठींतील उर्दू ढंगासंबंधीं—आणि विशेषतः पुण्यांतील त्याच्या स्वागतांसबंधीं--मला खात्री नव्हती. अशा स्थितींत खुद्द कवीचीच जेव्हां परिषदेच्या कचेरींत मुलाखत झाली, तेव्हां मला काव्यासबंधीं तरी शंका उरली नाहीं. जी काय शंका उरली, ती आमच्या महाराष्ट्रीय श्रोत्यांच्या प्रतिसादासंबंधीं ! श्री. पाटणकर यांनीं आपल्या पहिल्या मुलाखतींत

मला जसे कांहीं 'शेर' ऐकविले, तसेच काव्यश्रवणविषयकहि कांहीं रोखठोक मतेंहि ऐकविलीं. मराठी श्रोता श्रवणप्रसंगीं उत्साहशून्य असतो, हें मला माहीत होतें;—व त्यासंबंधीं मी जाहीर तक्रारहि केलेली होती. (अर्थात् मी हें गाण्याच्या बैठकींसंबंधीं म्हटलेलें होतें; तर श्री. पाटणकरांची तक्रार काव्याच्या मैफलीबाबत होती.) पण श्री. पाटणकर यांनीं आणखीहि कांहीं विचारार्ह टीका मजजवळ केली. ते म्हणाले, "दोन मराठी कवी भेटल्यास एकमेकांना पाण्यांत पाहतांना दिसतील; तर उलट दोन उर्दू कवी भेटल्यास एकमेकांची दिलदारपणें तारीफ करतांना आढळतील." मराठी कवींना दुसऱ्याची कविता ऐकून आनंद कां होऊं नये, हा श्री. पाटणकरांना प्रश्न पडला होता. त्यानंतर श्रोत्यांची वृत्ति! श्रोत्यांना तर मत्सरालाहि निमित्त नसल्यानें त्यांनीं कुरकूर न करतां आनंद कां प्रकट करूं नये? उर्दू काव्यगायनाच्या वेळचा श्रोत्यांचा उत्साह आणि प्रतिसाद पाहा; आणि मराठी श्रोत्यांचा 'इन्स्पेक्टरी' बाणा पाहा!

श्री. पाटणकरांच्या तक्रारी जितक्या खऱ्या होत्या, तितकीच तक्रारी बोलून दाखवण्याची त्यांची तऱ्हा 'उघडी' होती! पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांच्या कांहींशा अजब मराठी मुशायऱ्याचे वेळीं पुण्यांतील श्रोत्यांनीं त्यास 'उर्दू' उत्साहानें प्रतिसाद दिला!— आणि आंबट निरुत्साहाबद्दलचा आपला दुर्लौकिक कांहींसा धुवून काढला. याला थोडें कारण काव्यगायनापूर्वीं आम्ही उभयतांनीं अपेक्षारूपानें दिलेला इशारा हेंहि असूं शकेल; पण तेवढेंच कारण नव्हतें. काव्यांतील व काव्यगायनांतील श्री. पाटणकर यांची 'दिलेर' वृत्ति हेंहि त्या दिवशींच्या अनपेक्षित प्रतिसादाचें कारण होतें. उर्दू प्रेमिक हा 'कत्ल्' 'मौत' 'बीमारी' 'खूने जिगर' 'सितम्' यांची भाषा करीत असला, तरी तो खिन्न किंवा निराश सूर काढीत नसून, हिम्मत बांधून उभा असतो, ही गोष्ट पुष्कळ मराठी टीकाकारांना ठाऊक नसते!

वफाओंके बदले जफा कर रहे है।

अशी तक्रार केल्यावरहि, तो अखेर म्हणतो,

सितम् है सितम् जायेगा सलामत रहे तुम।
दुवा करनेवाले दुवा कर रहे है।

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत. 

माधवराव पटवर्धन म्हणतात—

'फुलपांखरापरि धांवरी तव वृत्ति खूप फुलांवरी।
न घडो प्रभो, कधिं पाप हें तुज घालणें कुणि पंजरी

\+ + +

अशा भूमिकेवरून केलेल्या प्रेमांत दुःख आहे,—पण जळफळ नाहीं; प्रेम आहे–पण प्रेमांतील अपयशाची खंत नाहीं! अशा 'दिलेर' प्रेमाचे 'शेर' कवि गाऊं लागल्यावर अरबी अर्थानेच केवळ नव्हे, ('शेअर–अरबी–काव्य-पंक्तिद्वय') तर फारशी अर्थानेंहि (शेर–फारसी–वाघ) अंगांत त्या 'शेरां'चा संचार होऊन निरुत्साह, मत्सर आदि शेळ्या मेंढ्यांची शिकार होते, असा अनुभव येईल! पाटणकर म्हणतात:

ऐसे तुला मी पाहिलें जे पाहण्याला नको होतें
खेळ माझ्या काळजाशीं मी कराया नको होते
सिंहापरी साहीन हा घाव मरणान्तावरी
कळणार ना कधिही कुणा झालें असें कांहीं तरी

पाटणकरांचीं 'दिलेर' वृत्ति म्हणून मी म्हणतो ती ही! उर्दू कवि 'मुकद्दर' (प्रारब्ध) आणि 'माशूक' (प्रिय व्यक्ति) यांच्यासंबंधींच्या फिर्यादीखेरीज वस्तुतः दुसरे कांहींच लिहीत नाहीं; पण 'शिकायत नही, शिकवा नही, तुम सलामत रहो' असें मात्र वर बजावीत असतो. मला वाटतें, शेलेनें म्हटलें आहे, Love's very pain is sweet. उर्दू कवीला 'माशूक' प्रिय असते असें नव्हे तर प्रेम प्रिय असते, आणि प्रेम प्रिय असते म्हणूनच 'दर्द' ही प्रिय असतो, कारण 'मोहोब्बत' म्हणजे एक दर्दच होय.

श्री. पाटणकर यांच्या कवितेंत केवळ दर्द सहन करण्याचीच 'दिलेरी' आहे असें नव्हे तर शृंगारांतील दिलेरीहि आहे. उर्दू कवितेंतील संभोग शृंगारांत एक प्रकारची ऐट आणि धिटाई असते. संस्कृत काव्याप्रमाणें केवळ कामोद्दीपक स्तननितंबांचे वर्णन नसतें तर सुंदरींच्या (हसीन) सान्निध्यांत नसानसांत अनुभवाला येणाऱ्या रोमँटिक उल्हासाचें चित्र असतें. या

उल्हासाच्या भरांत अुर्दू कवी शब्दांचे खेळ आणि अतिशयोक्ति करतो. पण ती अतिशययोक्ति पढिक कवींच्या काव्यांतील कोरड्या अलंकारासारखी नसते. माधवराव पटवर्धनांच्या दोन ऐटबाज ओळी पाहा.

‘ अुत्फुल्ल मिजासीत पदे टाकीत जासी
मार्गात किती लोळण घेतात बिचारी ’

एक अुर्दू कवि म्हणतो.

मल्के मिस्सी अपने दाँतोका रुत्बा कम किया
हाय ! गज़ब तूने किया हीरेका नीलम कर दिया

वास्तविक वरील दोन ओळींत संस्कृत पंडिती थाटाची अतिशयोक्ति आहे. पण संपूर्ण कविता पाहिल्यास त्यांत भावनांचीहि बेहोषी आहे असें आढळून येईल. याच कवितेंत कवि पुढें म्हणतो–

‘ देखा जो हुस्न-यार तबीयत मचल गयी,
आँखोका था कसूर छुरी दिलपे चल गयी । ’

या पंक्तिद्वयापैकीं दुसऱ्या ओळींत कोणकोणते अलंकार झाले त्यांची खानेसुमारी करणें मी आधुनिक मम्मटांच्यावर सोंपवतो. एवढें मात्र खास कीं, वृत्तीची बेहोषी नसतांना केलेली कोरडी पंडिती मात्र येथें आढळणार नाहीं.

श्री. पाटणकर यांच्या कवितेंत धिटाईच्या शृंगाराने सुचलेला धिटाईचा कल्पनाविलास हवा तेवढा आढळतो. ते म्हणतात–

‘ कुंतलांना सांग तव जे धांवले गालावरीं
दुर्बलांनी रक्षिले कां होते कुणा केव्हांतरी ’

यांतील ध्वनीवर संस्कृत काव्यशास्त्रज्ञ प्रसन्न होतील; पण आधुनिक रसज्ञ त्यांतील ऐटबाज अुमद्या वृत्तीवर म्हणजेच रसावरच खुष होतील. पाटणकरांच्या पुढील ओळी पहा...

“ पाहतां ओशाळुनी तूं मान खालीं घातली
बघवली नाहीं तुला ही आग तूं जी लाविली ”

पेटती ती आग आम्ही जन्मवर सांभाळतो
प्रीतिच्या पंथांत आम्ही अग्निपूजा मानतो ”

आजकालचे कित्येक नाविन्यपूजक कवी कल्पनेच्या नाविन्याला फार महत्त्व देतांना दिसतात. पण, खरें नाविन्य नव्या ‘प्रतिमा’त नसून जुन्याच प्रतिमांच्या अभिनव योजनेत असते. वेणीच्या पेडाना नाग म्हणण्याइतकी जुनी कल्पना दुसरी कोणती असूं शकेल ? पण नागाऐवजीं दुसरे एखादे प्रतिमान शोधीत बसण्याऐवजीं तेंच प्रतिमान योजून पाटणकरांनी केलेली बहार पाहाण्यासारखी आहे.

‘पेड वेणीचे तुझ्या वक्षावरी तूं सोडले
रक्षिण्या धन यौवनाचे नाग तू सांभाळिले !’

* * *

अुर्दू पद्धतीच्या दिलदारपणांत संस्कृत पद्धतीच्या अतिशयोक्तीचें पुढील मिश्रण पाहाण्यासारखें आहे.

‘बेवफाईचा तिच्या आरक्त वदनीं नीलिमा
अैसा खुले कीं मोहुनी मी तिला केली क्षमा’

* * *

हळुंवार भावना आणि रम्य कल्पना यांचे पुढील ओळींतील मिश्रण पाहाण्यासारखे आहे.

‘विंचरी हळूवार हातीं केस काळे आपुले
जीविताचे गे तिथें आहेत धागे गुंतले !’

* * *

अुत्तानपणा, अतिशयोक्ति आणि मरणाची सवंग भाषा म्हणजे अुर्दू शायरी असा सोयीस्कर समज आमच्याकडील कित्येक कविपुंगवांनीं केलेला आढळतो. आश्चर्यांची गोष्ट म्हणजे स्वतः माधवराव पटवर्धन अुर्दू कवितेच्या

सांकेतिकतेवर आणि अचाट अत्युक्तीवर भरपूर तोंडसुख घेत ! उर्दू कवींच्या प्रेमविव्हलतेच्या वर्णनांत बाह्यतः सांकेतिकता दिसली तरी सूक्ष्मपणें पाहिल्यास कोणत्याहि संकेताचा वापर त्या संकेतावर मात केल्याशिवाय केलेला आढळणार नाही. ' शमा ' ' परवाना ' ' महेफिल ' ' चिराग़ ' या सर्व शब्दांची व कल्पनांची योजना परिचितावर मात करूनच केलेली आढळेल. व ती मात केवळ मेंदूने केलेली नसून वृत्तीच्या दुर्दम्य बेहोषीनेच केलेली आहे असें आढळून येईल.

सवंग आणि सांकेतिक शृंगार हाच केवळ अुर्दू कवितेचा विषय नव्हे हे त्या कवितेंत वरचेवर आढळणाऱ्या अध्यात्मपर आणि तत्वज्ञानपर कल्पनांवरूनहि सिद्ध होईल. पण अुर्दू कवितेंतील तत्वज्ञानांत गूढता असली तरी क्लिष्टतेचा मात्र अंशहि सांपडणार नाही.

उदा :– सैगलने गायिल्यामुळें सर्वपरिचित झालेल्या आरजू लखनवि या पुढील दोन ओळी पहा–

' दुनीयामें हूँ दुनीयाका तलबगार नही हूँ
बाजारसे गुजरा हूँ खरीदार नही हूँ । '

* * *

या दोन ओळींत केवळ साध्या आणि प्रसन्न शब्दांत जेवढी विशाल तत्वज्ञानपर भूमिका व्यक्त झाली आहे तेवढी मराठींतील फारच थोड्या काव्यपंक्तींत व्यक्त झालेली आढळेल. हा साधेपणा आणि व्यापकपणा तुकाराम महाराजांच्याहि कित्येक ओळींत आढळतो, पण ' खुदी 'च्या तत्वज्ञानाची ही ऐट आणि ही अस्मिता खास अुर्दू प्रांतांतीलच आहे. महंमद इक्बाल लिहीतात

' निगाहें फ़क्रमें शाने–शिकन्दरी क्या हैं ? '

× × ×

श्री. पाटणकर यांच्या मराठी शायरींत अुर्दू इश्काबरोबरच खुदी, मृत्यू,

नश्वरता इ. विषयहि प्रामुख्याने आले आहेत. एक शास्त्री खास पदरी बाळगून श्री. पाटणकर यांनी न्यायदर्शनादि तत्वांचा अभ्यास केलेला असला तरी त्यांचे तत्वज्ञानपर शेर पांडित्यापासून अलिप्त आहेत. पाटणकर म्हणतात–

‘ आज ’ माझे नांव आहे, आहे अुद्यांचा ‘ काल ’ मी
‘ काल’चा आहे ‘ अुद्यां ’, ना मी ‘ अुद्यां ’ ना ‘ काल ’ मी ’

अुर्दू कवि स्वतःच्या दुःखाला पाहूनहि हसू शकतो आणि मृत्यूच्या कल्पनेलाहि हसू शकतो. पाटणकर म्हणातात.

‘ कफन माझे दूर करुनी पाहिले मी बाजुला
एकही आंसू कुणाच्या डोळ्यांत ना मी पाहिला
बघूनी हे माझेच आंसू भावले गालावरीं
जन्मभर हासूनही रडलो असा मेल्यावरी ’

× × ×

श्री. पाटणकर यांच्या कविता जेव्हां मी ऐकल्या, तेव्हां त्यांत लघु-गुरु-संबंधीच्या अुर्दू कवितेतील कांहीं सवलतींचा त्यांनी फायदा घेतलेला दिसला. त्याखेरीजहि कांहीं ठिकाणीं वृत्तविषयक शिथिलता मला आढळली. सभोंवतालच्या काव्यांत आज भाषाविषयक आणि वृत्तविषयक जी निरंकुशता दिसत आहे तिच्याकडे पाहिल्यास या उत्कट आणि उमद्या शायरींतील शिथिलतेचा अुल्लेख करण्याचेहि कारण नाहीं. ( बहुधा छापील आवृत्तींत ते दोष काढून टाकलेलेहि असतील. ) पण पक्वान्नाच्या आस्वादांत पात्राच्या बेडौलपणाने वैगुण्य उत्पन्न होऊं नये एवढ्याकरितांच हा उल्लेख केला.

पाटणकर यांच्या कवितेत आजच्या युगाला प्रिय असलेले नाविन्य आणि क्वचित् स्वैरताहि आहे. रूक्ष सौंदर्यविरोधी नवकाव्याऐवजी आजचे कांहीं नवकवि या रंगेल आणि स्वैर संप्रदायाचे भोक्ते बनले तर मला ती घटना एक इष्ट वाङ्मयीन घटना वाटेल.

—*श्री. के. क्षी.*
पुणें

# निवेदन

मराठी वाङ्मयांतील हा अभिनव काव्यप्रकार मराठी काव्यवाचकांना सादर करतांना मला अतिशय आनंद होत आहे. मराठी कविसंमेलन आणि उर्दू मुशायरा यांतील तफावतीची मला तीव्र जाणीव होऊं लागली. उर्दू शायरांत आणि मुशायऱ्यांतील श्रोतृगणांत दिसून येणारी बेहोषी आपल्या कविसंमेलनांतून क्वचितच आढळते, ही गोष्ट सर्वांच्या परिचयाची आहे. शायर हा एका आत्मविश्वासानें गात असतो. श्रोतृसमुदायाच्या रसिकतेची व खुल्या दिलाची त्याला खात्री असते. आपल्या शायरीला सहजोत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल असा त्याला विश्वास असतो. श्रोत्यांनाहि शायराबद्दल, त्याच्या कल्पनावैभवाबद्दल कांही निश्चित अपेक्षा असतात. आणि ते मोत्याच्या दाण्याप्रमाणे त्याचा प्रत्येक शब्द टिपून घेत असतात. या मुशायऱ्यांतून दिसून येणारी तल्लीनता आणि बेहोषी कांही औरच असते. या शायरीचें वैशिष्ट्य कशांत आहे, यावर मी विचार करू लागलों. मराठी काव्यप्रतिभेनें उर्दू शायरांचा अनुवाद करण्यापलीकडे मजल मारली नव्हती. इतकेंच नव्हे तर वरील प्रकारच्या काव्यनिर्मितीला मराठी काव्यप्रतिभा असमर्थ आहे अशा तऱ्हेच्या मूकसंमतीची जाणीव पुष्कळांना झाल्याशिवाय राहिली नसेल. खूप विचार केल्यानंतर मला उर्दू शायरीच्या अंतरंगाची कांहीशी कल्पना येऊं लागली. आणि ह्या रचनेचे एक विशिष्ट तंत्र आहे याचीहि पण जाणीव होऊं लागली. त्याप्रमाणें मी एक स्वतंत्र रचना करून पाहिली. माझ्यांतहि आत्मविश्वास

उत्पन्न झाला. या शायरीला अपेक्षेप्रमाणे प्रतिसाद मिळतो कीं नाही हें बघण्याचें मी ठरविलें. आणि येथील कांहीं निर्मत्सर अशा श्रेष्ठ साहित्यिकांना व रसिक श्रोत्यांना खास आमंत्रण देऊन टिळक-स्मारक मंदिरांत मी एक खाजगी मैफिल घेऊन पाहिली. माझ्या अपेक्षेप्रमाणे श्रोत्यांकडून उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाल्यावर मला माझ्या शायरीच्या यशस्वितेची खात्री पटली.

यानंतर शायरीचें पुस्तकच छापण्याची कल्पना माझ्या डोक्यांत येऊं लागली. पण तें छापण्याच्या अगोदर महाराष्ट्रांतील एखाद्या श्रेष्ठ साहित्य-समीक्षकाकडून त्याचें योग्य मूल्यमापन व्हावें असें मला वाटूं लागलें. सर्व-सामान्य महाराष्ट्रीय हा एखाद्या कलाकृतीचें यथायोग्य कौतुक करण्यास स्वभा-वानेच असमर्थ आहे, हें माझ्याप्रमाणेंच पुष्कळांना ठाऊक आहे. महाराष्ट्रीय श्रोता हाहि कलावंतास दिलखुलासपणे उत्साहित करूं शकत नाहीं. पण अनोळखी ठिकाणीं वरील प्रकारची अडचण पुष्कळशी दूर होत असते, हाहि सार्वत्रिक अनुभव आहे. पुण्याला कांही खाजगी कामानिमित्त गेलों असता राजकवि यशवंत व महाराष्ट्र साहित्यसभेचे अध्यक्ष प्रा. श्री. के. क्षीरसागर यांची मी मुद्दाम भेट घेऊन त्यांना हा काव्यप्रकार ऐकविला. महा-राष्ट्र साहित्यसभेच्या ‘ कै. पटवर्धन–भवना ’ मध्यें खास निमंत्रितांच्या उपस्थितींत शायरीचा एक कार्यक्रम घेण्यांत आला. माझ्या अपेक्षेप्रमाणें या काव्यप्रकाराचें पुण्यांतील रसिक श्रोतृवर्गानें यथोचित स्वागत केलें. ‘साधना’ ह्या साप्ताहिकाने “ मराठी काव्यांतील एक नवें दालन ” ह्या शीर्षकाखालीं एक लेख लिहून आपली रसज्ञता, गुणग्राहकता प्रकट केली. प्रा. क्षीरसागर यांनी या काव्यप्रकाराचें नुसतें कौतुकच केलें नाही, तर या पुस्तकाला एक सुंदर अशी प्रस्तावनाहि लिहून दिली. या एकाच गोष्टींत मी माझ्या शायरीचे साफल्य मानतो.

आज माझ्या डोळ्यासमोर मराठी शायरांचें एक स्वतंत्र मंडळ स्थापन करण्याची कल्पना आहे. अनेक ठिकाणीं कार्यक्रमाला गेलों असतां उदयोन्मुख अशा कवींच्या भेटी झाल्या. त्यांनी या काव्यप्रकाराचें नुसतें स्वागतच केलें असें नाही, तर या प्रकारची काव्यनिर्मिति करण्याचा निर्धार केला. मला आतां असा विश्वास वाटूं लागला आहे, कीं मराठींतहि आतां मुशायरा

घेणें कठीण नाही. आणि म्हणूनच माझ्या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या दिवशीं मी एक मुशायरा घेण्याचें ठरविलें आहे. शायरी या प्रकारांत दुर्बोधता आणि रूक्षता न शिरावी म्हणून शायरी मंडळाच्या काव्य-कृतीचे परीक्षक म्हणून कार्य करण्यास मी प्रा. क्षीरसागर व प्रा. म. ना. अदवंत यांना खास विनंती करीत आहे. अनेक शायरांच्याकडून आलेली शायरी एकत्र करून वरील दोन परीक्षकांच्या परीक्षणांत ती उतरल्यास दरवर्षी अशा शायरीच्या एका तरी पुस्तकाचे प्रकाशन शायरी मंडळाने करावें अशी माझी हार्दिक इच्छा आहे.

हें निवेदन पूर्ण करण्याच्या अगोदर या काव्यप्रकारास प्रोत्साहन दिल्या-बद्दल प्रा. क्षीरसागर आणि राजकवि यशवंत यांचे आभार मानणें मी माझें कर्तव्य समजतो. राजकवि यशवंत यांची आणि माझी मुद्दाम ओळख करून दिल्याबद्दल प्रा. मायदेव यांनाहि मी विसरणें शक्य नाही. आमचे येथील तरुण मित्र श्री. बळवंतराव बापट ह्यांनी वेळोवेळीं केलेल्या साह्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. त्यांच्या आग्रहाशिवाय आणि प्रेरणेशिवाय हें पुस्तक छापण्यास मी सहजासहजीं प्रवृत्त झालों नसतो, एवढें खरें. साहि-त्याच्या क्षेत्रांत कधीच पदार्पण न केलेल्या मला वेळोवेळीं प्रोत्साहन देऊन वऱ्हाडांतील प्रसिद्ध कवि श्री. गु. ह. देशपांडे, श्री. पां. श्रा. गोरे व नामवंत लेखक श्री. शरच्चन्द्र टोंगो ह्यांनी सदैव ऋणी करून ठेवलें आहे.

मराठी भाषेंतील ह्या अभिनव काव्यप्रकाराचें रसिक वाचक सहर्ष स्वागत करतील आणि अनेक उदयोन्मुख कवि अशा प्रकारची काव्यरचना करून मराठी वाङ्मयांत भर घालतील अशी आशा बाळगतो.

*—वा. वा. पाटणकर*

यवतमाळ,
दि. २३-१०-६१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. 92629

# शृं गा र

१

जाहलें कांहींतरी, जे व्हावयाला नको होतें
एकटक माझ्याकडे तूं बघायाला नको होतें
पूर्णबिंबा लाजवी, ऐसी मुखावर चारुता
लाजऱ्या डोळ्यांत होती, मृगशावकाची भीरूता
मिटविल्या ओष्ठद्वयी, होती करांगुलि रोविली
कीं न सांडो भूवरी, वाया सुधा अधरांतली
ऐसे तुला मी पाहिलें, जे पाहण्याला नको होते
जीवनाची वेल माझ्या मी खुडाया नको होते
यौवनोद्धत ऊर अुडवी रेशमी पदरा दुरी
सावरीता त्रासली होतीस त्या वरच्या वरी
गौरकायेची प्रभा नेसल्या वस्त्रांतुनी
शोभली जोत्स्ना शशीची विरल मेघा–आडुनी
ऐसें तुला मी पाहिलें जें पाहण्याला नको होतें
खेळ माझ्या काळजाशीं मी कराया नको होतें
सिंहापरी साहीन हा घाव मरणांतावरी
कळणार ना कधिही कुणा झालें असें कांहींतरी
जाहलें कांहीतरी जें व्हावयाला नको होतें ॥ धृ. ॥

२

कुंतलांना सावराया हात मागे गुंतले
त्याचवेळीं मजकडे जाणून त्यानें बघितलें
हासला निर्लज्ज वरूनी, मी लाजलें रागावलें
रागावलें, मी ही अशी, कीं हासुनी रागावलें

३

बघितलें नसतेहि आम्ही ना अशी जर लाजती
निखळत्या पदरास आणी हातही ना लावती
बुद्धापरी होतो उगे ठायींच आम्हीं आमुच्या
व्यर्थ आला अविनयाचा आळ माथीं आमुच्या

४

अंतरीच्या यातनांना अमरता द्याया खरी
निर्मिला मी ताज माझ्या शायरीचा त्यावरी
वेगळा हा ताज माझा, या जरा घ्या पाहुनी
यमुनेसवें गंगाहि येथें वाहते नयनांतुनी

५

पाहतां, ओशाळुनी तूं मान खालीं घातली
बघवली नाही तुलाही आग तूं जी लाविली
पेटती ती आग आम्हीं जन्मभर सांभाळतों
प्रीतिच्या पंथांत आम्हीं अग्निपूजा मानतों

६

अंचलाना सावरीशी मान घालुन खालती
लाजसी, मी काय समजूं आव्हान कां शरणागती ?

७

अपुल्याच दांतीं ओठ अपुला चावणें नाहीं बरें
हक्क अमुचा अमुच्या समोरी मारणें नाहीं बरें !

अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

कुंतलांना सांग तव जे धावले गालावरीं
दुर्बलांनी रक्षिले का होतें कुणा केव्हांतरी ?

९

हृदय—मुकुरीं पाहतों आम्ही तुला तर सारखे
पर्दा करी वा ना करी, दोन्ही अम्हाला सारखे

१०

सांग मी मरणार कैसा नेत्रबाणांनीं तुझ्या
जाणतो निःशंक आहे संजीवनी अधरीं तुझ्या !

११

पेल्यांतलें प्या मद्य, पण ओठांतलें प्राशूं नका
दुरुनीच याची ये नशा, जवळिं या जाऊं नका
प्राशणें तर दूर राहो, बघितलें नुसतें जरी
याची नशा, मी सांगतो; अुतरते मेल्यावरी

१२

यातनावरि प्रेम माझें, मज दुजें कांहीं नको
जन्मभर या याचनेला ' हो ' कधीं देऊं नको
लाभ तव होवोच ना जन्मांतही केव्हां मला
पाहिजे इतुकेच मज कीं " हाय, दुर्लभ तूं मला ! "

१३

दृष्टि मिळतां क्षणभरी, तव नजर वळते भूतलीं
' अर्थ ' ( earth ) व्हावी लागते सौदामिनी नेत्रांतली !

१४

बेवफाई जाणुनी मी जीव तिजवर लाविला
जाणुनी प्रासाद माझा वाळूवरी मी बांधिला

इंद्र मी श्वानापरी धावलो मागें तिच्या
मागीतलें सारें दिलें विश्वासुनी वचनीं तिच्या
अमृताचे कुंभ मी लाथाडिले पयातळीं
पायातळींच्या वाकुनी वेचिल्या पत्रावळी
सांगू खरें कां, का म्हणोनी केला स्वतःचा नाश मी
बेवफाईचीच होती जीवनीं माझ्या कमी !

१५

हृत्पटावरि रंगवीलें होतें तुझें जें चित्र मी
सांग तें पुसण्यास आतां आणूं तरी कोणास मी
मीच पुसतां त्यांत दिसती रंग मज इतुके नवे
चुंबुनी चित्रास पुसतो मीच माझीं आसवें !

१६

घेतला तूं वेळ जेव्हा सांवराया अंचला
वाटले तेव्हांच द्यावे ' थँक्स ' येउनिया तुला

१७

केव्हांतरी बघुनी जराशी हांस बस इतुकें पुरें
झाकांतल्या या हिरवळीला चार शिंतोडे पुरे !

१८

धस्स ना जर होतसे काळीज तूं येतांक्षणीं
अपुल्या मधे, कोणांत कांहीं, नक्की जरा आहे कमी !

१९

टाकिसी हळुवार इतुकी नाजूक अपुलीं पाउलें
टपकती हलकेच जैसी पारिजाताचीं फुलें
सुकुमारता जाणून आम्ही आहेत आधी बिछविलीं
पायातळीं केव्हांच तुझिया विकल हृदयें आपुलीं !

२०

अजवरी ना दाविल्या तुज अंतरीच्या भावना
संयमाने सोसल्या मी काळजाच्या यातना
आज आली मरणवेला जायचे आहे मला
हाय ! माझ्या संयमानें शेवटीं धोका दिला !

२१

जाणतो अुजडावयाचा केव्हांच नाही तव ‘ उद्या ’
वाटे तरीही तूं म्हणावें “ आज नाही पण उद्या ! ”

२२

जागलो कित्येक रात्रीं फक्त तुझिया चिंतनीं
लाविले ना नेत्र पळही गीतेंतला जणु संयमी
आजही मी जागतो इतुक्याच साठी रात्र ही
भेट ना होत्रो तुझी–माझी अता स्वप्नांतही !

२३

पेड वेणीचे तुझ्या हे पुरुषभावा पोचले
काबूंत ना उरले तुझ्या, भलत्याच जागीं पोचले !

२४

पेड वेणीचे तुझ्या तूं वक्षावरी या सोडले
रक्षिण्या धन यौवनाचें नाग तूं सांभाळले !

२५

उपमा तुझ्या वदनास त्याची मीही दिली असती सुखें
थोडें जरी चंद्रास येते लाजतां तुजसारखें !

२६

झाकिसी मुखचंद्रमा करपल्लवीं तूं लाजतां
सोसवेना एवढाही विरह आम्हांला अतां !

२७

लाजायचें नव्हतेस, आम्ही नुसतेच तुजला बघितले
वाटते कीं व्यर्थ आम्ही नुसतेच तुजला बघितले !

२८

होते असें भलतेंच कांहीं, इष्कांतल्या जगतीं इथे
हृदयही तेथेच जुळते, नजराहि ना जुळती जिथें !

२९

इतुक्याच साठीं लाविला ना हात मी तनुला तिच्या
भोगायची मज फक्त होती, लाज गालींची तिच्या !

३०

रूप–यौवन–संपदेची गाउंद्या काव्यें कुणी
गुंफिलें मी काव्य एका ' हाय ! ' या शब्दांतुनी !

३१

अंचलाचाही तुझ्या जर स्पर्श का होता मला
काय सांगू, इंद्रही मी तुच्छ असता लेखिला
धन्यता मज यांतही वाटते कांहीं नवी
भोगण्याला दर्द ऐसा खूप पुण्याई हवी !

३२

तनुलता नाजूक इतुकी जागजागीं वांकते
चालता नागीण वाटे, आता उभ्याने चालते !

३३

सांवरीले अंचलाते, पाहुनी तूं जे मला
संभावितीचा अर्थ माझ्या फक्त हा कळला तुला !

३४

मधुर–ध्वनी तव कंकणांच्या गेलों असा मोहून मी
कापतांना मान माझी ' उस्स ही ' केलें न मी

३५

विंचरी हळुवार हातीं केस काळे आपुले
जीविताचे माझ्या तिथे आहेत धागे गुंतले !

३६

जाणते ती लाख नुसत्या जीव घेण्याच्या तऱ्हा
सरळ आहे भांग आणि निष्पाप आहे चेहरा !

३७

घट्ट इतुके पीळ अपुल्या वेणीस कां देतेस तूं ?
वेणी नव्हे ते हृदय माझें हातीं तुझ्या धरलेस तूं !
वेणी नव्हे, तो केस आहे एक वेणीचा तुझ्या
सांग मग कां त्या नसावी ओढ गालीची तुझ्या ?

३८

भास्करा, येते दया मजला तुझी आधीमधीं
पाहिली आहेस कारे, रात्र प्रणयाची कधी ?

३९

बेवफाईचा तिच्या आरक्त वदनीं नीलिमा
ऐसा खुले, कीं मोहुनी, मी तिला केली क्षमा !

४०

जायचे भलत्याकडे, जा सुखे निःशंक जा
परत येतांना तरी या दारावरूनी येत जा !

४१

बेवफाईचा तिच्या जर घाव ना बसतां उरी
निर्मिता आलीच नसती जन्मांतही मज शायरी !

४२

स्पर्श ना होवो तुझाही, स्तनमंडला म्हणुनीच तूं
उचलशी हलकेच अपुल्या निखळत्या पदरास तूं

येते मनीं हज्जारदा बोलूं तरी तुजशी कसे ?
वाटते यांना तरी तूं लाडवूं नाही असे !

४३

लाजवीलें चारुतेने अप्सरांना आज तूं
वस्त्र माझ्या भावनांचे नेसली आहेस तूं
सांभाळणें हें वस्त्र अगदी सोपें नको समजूं कधी
उडतात याचे रंग केंव्हां सांगतां ये ना कधी !

४४

विकल होतें, हृदय अमुचें, नेत्रबाणें, हें खरें
रडविण्या तुम्हास अमुचे फक्त ना बघणे पुरे !

४५

भिन्न मद्यांच्या चवी आम्ही क्रमाने चाखतो
पेल्यांतली घेऊन आधीं ओठांतली मग चाखतो
वेगळी कॉक्टेल ऐसी एकत्र ना मिसळायची
सांगतो याची मजा चौघांत नाही यायची !

४६

झाकताना वक्ष तव हा अर्धाच उघडा राहिला
वाटते प्रत्यक्ष रतिने डोळा कुणाला मारिला !

४७

मरती जिते पण प्रेतही हांसते आनंदुनी
ना कळे डोळयांत तुझिया संहार कां संजीवनी !

४८

पेड वेणीचा तुझा, पाहोनिया वाटे मना
लाभला नागास काळ्या, चंद्रबिंबाचा फणा !

४९

नेसली जॉर्जेट काळे, गौर तनु झांकावया
आज वाटे अवस आली पौर्णिमा ग्रासावया !

५०

कुठवरी सोसावयाच्या यातना तुज पाहुनी
वाटते की ठीक होती चाल पडद्याची जुनी !

५१

फिरविली रागावुनी तूं पाठ तव माझ्याकडे
चारुता तितुकीच आहे बाले तुझी मागे पुढे !

५२

कोणतेही एक आता, आहे मला विसरायचे
विसरायचे आहे तुला, किंवा मला विसरायचे
अभ्यासिली मी दर्शनें, मज कांहीच नव्हते समजले
मानिती, अद्वैत, कां तें, इष्कांत मजला समजले !

५३

मजनू ! अरे, भलताच कांहीं पंथ तूं हा काढला
वेड्या ! अरे तूं जन्म सारा रडण्यांत नुसता काढला
सौंदर्य तर आम्हांसही कळते जरा रडण्यांतले
रडण्यांतले तुझिया नव्हे लैलाचिया रडण्यांतले !

५४

सांगीतले होतेस " तुजला भेटेन मी केव्हांतरी "
उगवला जन्मांत नाही, माझ्या तुझा 'केव्हांतरी'
आज विझले प्राण माझे वेळ ना गेली परी
अद्यापहि आहेत उघडे नेत्र मी मेलो तरी !

५५

नयनांतला हा भाव माझ्या समजला जेव्हा तुला
विसरली जाणून तूही सावराया अंचला
नाही पुन्हा दिसलीस आणी ना पुन्हा दिसशीलही
विसरलो नाही तुला अन् ना कधी विसरेनही !

५६

माघार तर इष्कांत आम्ही केंव्हाच नाही घेतली
घेतली जी जिद्द सारी पूरी करोनी घेतली
ऐसे नव्हे की आजही कांही कमी आहे मला
आम्ही तरी गमतींत थोडा जोगवा मागीतला !

५७

उन्मेष ज्यांच्या यौवनाचा कांहीच ना झाला कमी
प्यायले जे खूप, ज्यांना वाटे परी झाली कमी
गातसे त्यांच्याचसाठीं फक्त माझी शायरी
सांगतो इतरास " बाबा, वाचा सुखे ज्ञानेश्वरी "

५८

भावना केंव्हातरी या सांगेन तुजला वाटलें
हाय ! पण प्रत्येक वेळीं हेंच मजला वाटले !

५९

पेड वेणीचे तुझ्या हे सोडूं नको मागें पुढें
आम्ही तरी कैसे बघावे सारखे मागें पुढें ?

६०

घेती जरा का वेळ थोडा सांवराया अंचला
मानिलें असतेंहि, अमुची पर्वा जरा आहे तिला !

६१

ओळखीही ना दिली लैलास, ते मज़नू अम्ही
यातनासह जन्म गुजरूं भीक ना मागू अम्ही !

६२

पेड वेणीचे तुझ्या जे लोळले वक्षावरी
मागे तुझ्या लपतील बेटे, वेळ जर आली खरी !

# जीवन

१

भूतकाला त्रासुनी मी वर्तमानीं धावले
आलिंगनीं विश्रब्ध त्याच्या शांत होते झोपले
स्वप्नांतही पण त्यास बघतां उघडली मीं लोचनें
आलिंगुनी मज घेत होता तोच माझी चुंबनें

२

हें खरें की कंटाळलो या जीवना अगदी पुरा
मृत्युची तर कल्पनाही जीव करिते घाबरा
वाटते की आज मजला कांहींतरी ऐसें हवें
ऐसें हवें कांही तरी जें जगणें नव्हे मरणें नव्हे

३

सासू रडे, होते जिनेही जन्मभर मज गांजिलें
रडती पती, ढुंकूनही, ज्यांनीं कधीं ना पाहिलें
वैधव्य माझ्या वास्तवांतिल सारेंच हें झांकावया
म्हणती अतां प्रेतास माझ्या सौभाग्य लेणे लेववा !

४

उन्मेष माझ्या यौवनाचा कांहींच ना झाला कमी
एक जागीं फक्त बघतो दर्पणी वार्धक्य मी

बिंब तें प्रतिबिंबें नोहे शास्त्रसंमत हें जरी
मी तरी घेऊं कशाला वार्धक्य तें माझ्यावरी ?

५

तोच जगला, त्याने खरोखर जिंकिलें या जीवना
शेवटी उरला न कोणी ज्यास प्रिय मृत्यूविना !

६

मरत होते लाख मजवर होते अशी मी एकटी
लाखावरी मी आज मरते हाय पण मी एकटी !

७

हृत्कपाटा लाववी, आंतून मी माझ्या कडी
स्वस्थ आता पीत बसलो सात नंबरची बिडी !

८

नजरेंतुनी ती दूर होता, वाटले मृत्यू बरा
आज ती नजरेस येतां, वाटले मृत्यू बरा !

९

जीवनाचा मार्ग आहे सरळ सीधा मोकळा
मात्र त्याला, जो खरोखर डोळे मिटोनी चालला
जाणतो, आहेत कांटे आहेत पण ते बाजुला
काय त्यांचे त्यास, जो ना गेला कधीही बाजुला ?
मानते त्या विश्व सारें, मी हात त्यातें जोडले
पायातळीं आहेत ज्याच्या लाख कांटे मोडले !

१०

जोंवरी दुसऱ्याविना मज हांसताना येईना
तोंवरी हे दैन्य माझे जन्मातही संपेल ना !

११

माझ्याच आलीं आसवें डोळ्यांत, येता परतुनी ?'
म्हटलेहि नाही पण तिने की " याल काहो परतुनी ?"

अनुक्रम 32034 दि: ९।१०
क्रमांक १२ ९४५० नों दि २।४।५२

म्हटलें कधीं का मी प्रभो, कीं मला रडवूं नका
फक्त माझी आंसवें ही, इतरा कुणा दावूं नका !

१३

दोन भोळे नेत्र होते, केस होते मोकळे
रेखीव होते सर्व कांहीं हृदय होतें मोकळें
पुण्यदर्शन चारुतेचें नव्हतें मला घडलें कधीं !
फिरुनि ना मी वळविले हे पाय पण तिकडे कधी !

१४

हाय, माझ्या जीवनीं या कांहीं नसे आतां नवें
पूर्व-स्मृति डोक्यांत माझ्या, डोळ्यांत माझ्या आंसवें !

१५

अजवरी शब्दांतुनी मी वाहवीली शायरी
यापुढें वाहील नुसती नयनांतुनी गालांवरी

१६

इतुकेच आहे स्वप्न माझें कीं तुला केव्हां तरी
आलिंगनी विश्रब्ध माझ्या ऐकवावी शायरी
ऐकतांना रंगलेले भाव नयनीं पाहतां
अनुभवावी जीवनाची, अन् शायरीची सफलता !

१७

एक नाही सूत्र कोठे, घडलें कधी कांही तरी
जीवनाचा ग्रंथ माझा ना नाट्य ना कादंबरी

१८

एकटें वाटे बसावें, कोणी नको माझ्यासवें
आहेत माझ्या सोबतीला अन्मोल माझी आंसवें

चोरट्या नुसत्या स्मृतींच्या अंतावरी चोखीत मी
सागरीं या आंसवांच्या कृष्णापरी झोपेन मी !

१९

नाही फुलें, नाही फळें, नाही कळ्या ना पालव्या
डोकावते आशा तरीही पांखरांची पण नव्या

२०

घेतला संन्यास मी हा, जीव संसारा विटे
आज विटलो यासही मी सांगा अतां जाऊं कुठें ?

२१

म्हणती मला " शाबास तुम्ही सर्व कांहीं सोडलें "
मी तरी सांगूं कशाला कोणी कुणाला सोडलें !

२२

घेउनी आलाप जेव्हा लावितेसी षड्ज तूं
सोलिसी हासून माझ्या काळजाची साल तूं !

२३

तुडविणें सत्यास माझे, नील व्योमी पाहणे
पायातळीं अंगार माझ्या डोक्यांत माझ्या चांदणे

२४

मीच मजला न्याय देउुन फांसावरी मज टांगलें
जन्मांत मी इतुकेंच केलें कांहीं खरोखर चांगले !

२५

तळपतो वैराग्य-भानू वैराण माझ्या जीवनीं
वासनांची वेल पण ही जोमांत येते बहरुनी

२६

समजूं नका दुर्भाग्य माझें आंसूं जरी मी गाळिते
गाळण्याला आंसवेंही, भाग्य कांहीं लागतें !

सौख्य–स्मृतिचा एक क्षणही, जीवनीं ज्या नाठवे
सांगा कधी येतील कां हो डोळ्यांत त्याच्या आंसवें ?

२७

बाजुचे दोन्ही किनारे सरकतांना पाहतो
आज मी या जीवनौघीं निर्माल्य होऊनि वाहतो
फक्त आहे पाह्यचे येईल जें आतां पुढें
पाषाणही म्हणतील आम्हा साधले ना येवढे !

२८

इत्यर्थ माझ्या जीवनाचा इतुकाच आहे समजला
समजलो ना मी कुणाला, कोणी न मजला समजला !

२९

" दुनिया बडी बेमान ? " ऐसे सांगतो सर्वांस मी
दोस्त हो सांगू खरे कां ?–मीही मुळी नाहीं कमी !

३०

भावनांची राख माझ्या पुरती न विझली जोवरी
झाली तरी होईल कांहीं फक्त तोवर शायरी
ज्यांनी दिला हा दर्द त्याचे मानतो उपकार ते
शायरी बहरावयाला कांहीं जळावें लागते !

३१

रक्ताळल्या या काळजाचे थेंब फिल्टर होउनी
धावले गालावरी हे दोन आंसू होउनी
यातना घेतात जेव्हा आसरा या अक्षरीं
आधी नव्हे, तेव्हां कुठें जन्मास येते शायरी !

३२

सुप्त प्रतिभा जागवीली फक्त नुसते हासुनी
फुलविली फुलबाग, क्षण ही वैराण माझ्या जीवनीं

सलतें उरीं इतुकेच कीं हें दुर्भाग्य माझें केवढें
गायिली केव्हांच नाही शायरी मी तिज-पुढें !

३३

ना कळे की काय आता जीवनीं माझ्या उरे
ज्योत तर केव्हांच विझली वात नुसती चरचरे !

३४

दर्द तर संपून गेला आपुल्या स्नेहांतुनी
वाटते इतुकेच की, ही ओळखी आहे जुनी !

३५

होतो तयाचा आज आम्हा भासही नुसता पुरे
ना मिळोही मद्य आता टमरेलही नुसतें पुरे
जिंकावया या जीवनाची विकलता अन् विफलता
आहे शिगेला पोंचली आम्हांतही निर्लज्जता !

३६

मृत्युची छाया जशी ही स्पष्ट होऊं लागली
आता कुठें या जीवनाची ओढ वाटूं लागली
मध्यान्हिची या सोय जेव्हां एकही ना राहिली
तेव्हा कुठे चूर्णा–विनाही भूक वाढू लागली !

३७

पाह्यचा आहे मलाही इन्सान हा कोणी नवा
शायरी ऐकून माझी ना म्हणे जो " वाहवा " !

३८

पाहते सर्वांकडे ती, माझ्याकडे ना पाहते
इतुक्याचसाठीं मानतो की माझ्याकडे ती पाहते !

३९

देवा ! अरे, म्हणती तुला, की खरोखर थोर तूं
आंसवें माझीं पुसाया आलास का पण सांग तूं ?

विसरला नाहीस माझ्या पापकर्मांचे घडे
विसरतो आम्हीच जेव्हां रडतो कुणी अमुच्या पुढें !

४०

जळलो असा इष्कांत कीं, मी साफ झालो कोळसा
भवसागरीं नक्की अतां बुडणार मी नाही असा !

४१

इतुकें खरें, कोणाकडे, जाणून ना पाहूं अम्ही
हेंही खरे कोणाकडे नुसतेच ना पाहूं अम्ही !

४२

मोल मोत्यांचे तुझ्या या आंसवा होते दिले
आंसवे डोळ्यांत बघतां काळीज माझें हाललें
आलें मला समजूनिया कीं मूर्ख मी होतो खरा
सारेच ते " कल्चर्ड " होते, एकही नव्हता खरा !

४३

दोन असती मूर्ख जगतीं ते स्तुतीला भाळले
भूवरीं बिंबानना, अन् देव त्या स्वर्गांतले !

४४

खूप होतें प्रेम अमुचें, नव्हतें तसें तें नाटकी
वाटलें, अमुच्यापुढें मजनू फिका, लैला फिकी
जाणतो कीं, आज आम्ही दूर जातों प्रत्यही
मौज ही, याचा आम्हाला ना खेदही, ना खंतही !

४५

धन्य त्यांच्या संयमाची, धन्य त्यांची संस्कृती
सोडती निश्वास नुसते मान घालुन खालती
मानतो आम्हास ऐसे साधेल ना जन्मांतही
करतो अम्हा बेताल नुसता बघितल्याचा भासही !

४६

ऐसे नव्हे कीं बेवकूफी माझी मला ना समजली
समजली प्रत्येक वेळीं, थोडी उशीरा समजली
सांगूं खरें मी बेवकूफी फक्त त्याची मानतो
जीवनीं जो बेवकूफी, बेवकूफी मानतो !

४७

पाहिलें मी सौख्य, भलता काळही ना पाहिला
आज पण आंबा अढीचा उतरावयाला लागला

४८

बघितलें नाही तरीही, हांसला मज पाहुनी
रागावलें मी ही जरा, गेलें जराशी लाजुनी
इतुके खरें कीं त्यास कांही भलतेंच वाटूं लागलें
हेंही खरे, आम्हास कांही भलतेंच वाटूं लागलें !

४९

कांहीच ना झाले कमी, मी कांहींच ना केलें तरी
घरच्या घरीं वार्धक्य आलें मरणही घरच्या घरीं !

५०

हांसतो वरतून नुसती विकलता लपवावया
आळवीतो मांड जेव्हा डोक्यांत माझ्या जोगिया !

५१

आनंदवीते ना मलाही, ना तमाला उजळते
जीवनाची ज्योत आतां केवीलवाणी तेवते
जीवनाची ज्योत जैशी निस्तेज व्हाया लागली
प्रीत ही माझी तमाशीं रोज वाढूं लागली !

५२

सम्मानिले वैराग्य आम्ही, श्रृंगारही सम्मानिला
अंकावरी आहे रतीच्या बुद्ध येथें झोपला !

५३

इष्कांतले सम्राट आम्ही धुंद अमुची वेगळी
लक्तरें अंगावरी पण ऐट अमुची वेगळी
येउनी जन्मास आम्ही, बर्बाद हे झालो असे
झालो असे बर्बाद आम्ही बर्बाद ना झालो तसे !

५४

जीवनीं येऊन आहे जाणले इतुकेच मी
व्यर्थ लढलो दुर्जनांशीं, निर्दाळण्या अन्याय मी
टांगलें फांसावरी त्यांनी मला पण जेधवां
न्यायदानाची तयांच्या, केली जगानें वाहवा !

५५

काळजावर हात दाबुनी विवळलो मी जेधवा
रसिकवर धावूनि आले बोलती " शाबास वा ! वा ! "
प्रेमविव्हळ काव्य ऐसे, ऐकिलें ना केधवा
गाणें असो, रडणें असो आम्हा पुनः हें ऐकवा

५६

बेफाट आहे खेळलो मी, स्वच्छंद येथे अजवरी
चाळीत आतां स्वस्थ बसलो जीवनाची डायरी
जेथे जिथे दिसतो गुन्हा दोन आंसू गाळतो
कांपऱ्या हातीं पुनः पण पान दुसरे उलटतो
प्रत्येक पानीं टपकल्या या आंसवा पाहोनिया
कांहीं म्हणो कोणी परंतू माझी मला आली दया !

५७

ओळखी नव्हती तरीही आले मला भेटावया
आज घर शोधीत आले ' सायूटिका, ' ' इन्सॉमनिया '

५८

सोडिले ना घर कधीही गेलोच ना कोण्या घरीं
काळ पण आला असा, मी पाहुणा घरच्या घरीं !

५९

वाटले नव्हते कधीं हा काळ आहे यायचा
संपेल हें उद्यान आणि आहे सहारा यायचा
झाले जणूं झोपेंत सारे कांहीच ना कळलें कधी
कळलेच ना मी वृद्ध ऐसा झालो कधीं, मेलो कधीं !

६०

तोंडही माझे अतां ती नाखूष असते पाहण्या
जाणतो मीही तसा, नाही तिचा कांही गुन्हा
पाहिले, माझ्यांतही, नव्हतें तसे कांही कमी
फक्त होतीं दोन वर्षें षष्ठयब्दिला माझ्या कमी

६१

अंचलांनो, कुंतलांनो, द्या रजा घ्या शुक्रिया
वेगळ्या विश्वांत आतां आहे निघालो जावया
मानतो आभार तुमचे, मानतो उपकार मी
निर्भत्सिण्या तुम्हास नाही साधू कुणी वा संत मी !

६२

निर्भत्सिती ह्या जीवना, तीं दर्शने वाचूं नका
कोणताही राग गा, पण ‘ जोगिया ’ गाऊं नका
संगीत अपुल्या जीवनाचें अंतावरीं गाऊं सुखें
मंद्रात मिळवूं प्राण आणि ठेक्यांत देऊं आंचके !

६३

देवा ! अरे ! म्हटलेंहि असतें कीं खरोखर क्रूर तूं
यातना नुसत्याच ऐशा आम्हा जरी देतास तूं
यातना नाहीं दिल्या, नुसत्याच तू त्यांच्यासवें
निर्मिलीं आहेस अमुच्या डोळ्यांतही पण आंसवें !

# मृत्यु

१

वैतागुनी या जीवनाला आलो तुला भेटायला
हाय मृत्यो ! दारीं तुझ्याही केवढा 'क्यू' लागला !

२

मृत्यो ! अरे, येतास जर का बोलाविता कोणी तुला
मानिलें देवास नसतें मानिलें असतें तुला !

३

मृत्यो ! अरे, येतास जर का भेटण्या थोडा अधीं
झालीच नसती जीवनाची शोकांतिका माझ्या कधीं !

४

मृत्युची तर हौस मजला, मेलो असा कित्येकदा
आवडे मज जन्मणेंही, जन्मलो कित्येकदा
इतुकेंच कीं एकाच वेळीं एक मजला आवडे
जगतां भितो मृत्यूस आणी जन्मांतही ये रडे !

५

मृत्युची ना खंत मजला, काय मी जगुनी करूं ?
कां करूं इन्कार जगण्या, काय मी मरूनी करूं ?
दोहोंमधें इतुकाच दिसतो, भेद हा माझ्या मतें
आहेत उघडे नेत्र आतां, मेल्यावरी मिटतील ते !

६

जाणतो नरकांत भगवन्, लोटुनी देशील तूं
उभवीन तेथे स्वर्ग, मग लाजुनी म्हणशील तूं
" जाऊं द्या सारेंच विसरा, सारेंच आतां जाऊं द्या
सोडिला मी स्वर्ग मजला, येथेंच येउनि राहुं द्या !

७

बांधला गाऱ्यावरी, रेडा तसा हा आज मी
एकटा चघळीत बसलो नुसत्या स्मृतींचा घास मी
मृत्युची थोडी कुठोनी चाहूलही येतां मला
येतो जरासा धीर आणि वाटे नसे मी एकला !

८

आसवांचीही अपेक्षा, ना कधीं करणार मी
रानींवनीं कोठेतरी, जाउनी मरणार मी
प्रेतावरी पडतील माझ्या रानवेलींची फुलें
अंत्यसंस्कारास आणि, घारी गिधाडें कावळे !

९

मत्तगंधाची जिथें रानवेलींची फुलें
दिसतील तेथें जाण माझें प्रेत आहे गाडलें
मोहुनी येतील जेव्हां भृंग त्या कुसुमावरी
जाणतो मस्तींत तेथें गातील माझी शायरी !

१०

काय सांगूं शेवटीं या जीवनाची दुर्गती ?
ऊर्ध्व होता लागला, पण हरवली नव्हती स्मृती
होते उभे बाजूस कांहीं लौकिकास्तव सोयरे
मूल्य माझ्या जीवनाचें तेव्हां मला कळलें खरें !

अनुक्रम ३२०३१ वि: काव्य
क्रमांक ११७५५० नों दि २५५८

कफन माझें दूर करूनी, पाहिलें मी बाजुला
एकही आंसू कुणाच्या, डोळ्यांत ना मी पाहिला
बघुनि हे माझेच आंसू धावले गालावरी
जन्मभर हासूनही मी, रडलो असा मेल्यावरी !

१२

मेल्यावरी मी एकदा, परतुनी आलों घरी
तेच होते दार आणी तीच होती ओसरी !
होती तिथे तसबीर माझी, भिंतीवरी त्या टांगली
खूप होती धूळ, आणि कसर होती लागली
पाहून मी अदृश्य हातीं, तसबीर नेली उचलुनी
सांगतो याची तिथे चर्चाहि ना केली कुणी !

१३

अजवरी नाही निराशा, केली कुणी या जीवनीं
वाटते करशील मृत्यो ! फक्त तूं ना येऊनी !

१४

नाकळे तेव्हां कुठें, आणि कसा राहीन मी
फोटोंतुनी, नुसताच जेव्हां, तुमच्याकडे पाहीन मी !

१५

जन्मलो तेव्हांच होतें, लग्न अमुचे लागलें
बघितले होते तिने मज मीच नव्हते बघितले !
समय माझ्या मीलनाचा, होती उभी मोजीत ती
आज भेटे मौत मजला, जैसी शिवाला पार्वती !

१६

कां बरें मृत्यू मला, भेटण्या ओशाळतो ?
सांगा तया, ' जगण्यास आतां, मी खरा ओशाळतो ! "

१७

जन्मांतही नव्हते कधी मी, तोंड माझे लपविलें
मेल्यावरी संपूर्ण त्यांनीं, वस्त्रांत मजला झांकिले
आला असा संताप मजला, कांहीच पण करतां न ये
होती मला जाणीव कीं " मी मेलो अतां बोलूं नये ! "

१८

रोज मृत्यू पाहतो, अमर मी वाटे परी
वाटते की हेंच मजला, वाटेल मी मेलो तरी
कां असे वाटे परंतू, दिसतें तयाहुनि वेगळें
सत्य हें, कीं, सत्य असतें, दिसते तयाहुनि वेगळें !

१९

मृत्यो ! अरे येतास जर कां, होउनी साकार तूं
सांगीतले असते तुलाही, कोण मी अन् कोण तूं
गोष्टी तुझ्या या पौरूषाच्या, ना बोलल्या तितुक्या बऱ्या
तुजहुनी मृत्यो अरे, या कॉलेजच्या पोरी बऱ्या !

# वि नो द

१

आरशांतुन एकटक, मज कुणी पाहात होते
नयनींच होता जीव बाकी सर्व कांहीं प्रेत होतें !

२

चेहरा जेव्हां स्वतःचा, दर्पणीं मी पाहिला
सांगतों प्रत्यक्ष तेथें हनुमान आम्ही पाहिला
मिचकावुनी डोळे मला, तो फक्त इतुकें बोलला
" वेड्या अरे आता कुठेंही राम नाही राहिला ! "

३

भीड मज बाई कुणाची, मोडवत नाहीं कधीं
सुचविता कोणी कसेंही, नाहींच ना म्हणवें कधी
एकदां सांगून बघते, " हे बघा ऐका जरा "
सांगते खुश्शाल मग मी " काय वाट्टेल तें करा ! "

४

सहज आला जवळ अन् पाहुनी म्हणतो कसा
" जातो बुवा परतून जर ना म्हणशील तूं की 'या बसा' "
मी ' बसा ' म्हणतांच बाई, खेळ जे झाले सुरू
सांगते सारे तुम्हा, ' चर्चा नका याची करूं ! '

५

ती म्हणाली, " सांग कैसा विश्वास ठेवूं तुजवरी ?
पाहिला आहे कुणी का लठ्ठ मजनू अजवरी ? "
मी म्हणालो, " रोड मजनू यापुढें विसरा तुम्ही
म्हटले तरी आहात कां हो, नाहीं कधीं कोणा तुम्हीं ? '

६

बघितल्या साड्याच नुसत्या, नव्हतें तुला मी बघितलें
नेसता नॉयलॉन तूं हें, आज तुजला बघितलें !

७

बाजार सारे कापडाचे, बंद होवूं लागले
घरच्या घरीं शिंपी बिचारे, प्राण सोडूं लागले
राखावयाला सुव्यवस्था, पोलीस धावूं लागले
देशांत या सारेच आतां, नॉयलॉन नेसूं लागले !

८

ती म्हणाली, " बघितले कां नॉयलॉन आहे नेसलें ? "
विश्वासलो नाहीं, तिला मी, हात लावुनी बघितलें
स्पर्शही ना जाहला, हातास त्या नॉयलॉनचा
द्याल मज फांशी तरीही, नाही पुढें सांगायचा !

९

भलताच आला काळ आतां, हृदयीं नका कोणा धरूं
शर्टावरी उमटेल तुमच्या ओष्ठद्वयाचे पांखरूं !

१०

भलताच आला काळ आतां, गमती तरी सांगूं किती
वाटते मजनूस अपुल्या विनयभंगाची भिती !

११

केंसास देती वेव्हज आणि, सारे पावडर लावती
एक आहे वेषभूषा, लाडीक सारे बोलती

समजावयाला भेद आतां, कुंठली माझी मती
कोण लैला, कोण मजनू, फक्त योगी जाणती !

१२

मानवा निर्मून प्रभुने त्यास म्हटलें, " सांग तूं,
सांग रे, तुज, काय देऊं, जे वाटलें तें माग तूं "
हात जोडुन तो म्हणे " देवा अतां कांहीं नको,
छान झाले सर्व कांहीं, फक्त येथे तूं नको ! "

१३

होणार होतो मुक्त अगदी, नव्हती मला कसली तमा
हाय पण ही आड आली, अर्धांगिची वटपौर्णिमा !

१४

खोलीवरी आलीस तूं, अन् चाळवोनी शेपटे
लाजुनी पुसिलेंस मज कीं, " आहांत कांहो एकटे ? "
आनंदुनी मीही म्हणालो, " आज तर आहे सुटी
ये अशी निःशंक ये, आहेस ना पण एकटी ? "

१५

केसास देतो ' वेव्ह्ज, ' (Waves) आम्ही फेसपावडर लावतों
घालतो बुशकोट जैसा, ब्लाउज आम्हीं घालतो
' मर्द ' पण आम्हा म्हणाया शंका नका आणूं कधी
सांगतो शपथेवरी " बाळंत ना झालों कधीं ! "

१६

शिवत असते प्रेस-बटणें ब्लाऊजची ती नेहमीं
येतात तिज भेटावयाला वर्ग-बंधू नेहमी !

१७

' एम. ए. ' मराठी जाहली, करिते सभेंतून भाषणा
हाय, ना मी ऐकिले पण जन्मभर ' ऊंहू ' विना

१८

प्रार्थिलें ना मज कधींही ' होय ' मी म्हटलेंहि ना
अनुनयाचा मार्ग साधा त्याला कधी सुचलाहि ना
झाल्यावरी सारें म्हणे, " मानूं नको विपरीत तूं—
' फक्त करतो प्रेम आम्ही, बोलतो ना फालतू ! "

१९

माझिया नाजूकतेची, भलतीच धास्ती घेतली
चुंबने घेतो जशी कीं, घेतली ना घेतली !

२०

जेथें जिथें या सुस्तनांचा, भार दुस्सह पाहतों
येते दया आम्हास, आम्ही, तेथें सहाया धावतों !

२१

उघडिलें मी दार आणि, जीभ माझी चावली
वाटलें भलतेंच, पण ती नॉय-लॉन होती नेसली !

२२

ऐका प्रतिज्ञा आमुची, कांहींच नाहीं आम्ही करूं
घरच्या घरीं रडतील बेटे राजेंद्रबाबू—नेहरू !

२३

येतीच ना परतून अमुची, माय सीता मागुती
विसरलो केंव्हांच असतो, द्रौपदीची दुर्गती
समरांगणी असतें उभे, रंगमंचक आमुचें
असतो जरी त्या कालखंडी, सारे अम्ही कॉंग्रेसचे !

२४

मारतो आम्हीं मुलें, वृद्ध, बाया, अर्भकें
पाहुनी निःशस्त्र जनता नेम ना अमुचा चुके
दरडावुनी आम्हास कोणी लाथ जेंव्हां हाणतो
प्रकटतें बंधुत्व, आम्ही दिल्लीस त्या बोलावितो !

२५

भारताची राजनीती, आहे जयांना समजली
आहे तयांची सोय सारी, ठाण्याचिया इस्पीतलीं !

२६

चुंबनें घेऊन माझी, मागे जसे ते परतले
बोलावुनी त्यांना म्हणाले, " लाजायचें मी विसरलें ! "

२७

बोले कुणी कीं, " जात स्त्रीची बेमान ही आहे खरी "
आनंदुनी मीही म्हणालो, " आतां मजा आहे खरी ! "

२८

उचलतो ना शस्त्र आम्ही, फक्त जोडे उचलतो
मारतो ना ' बॉंब ' आम्ही, फक्त डोळे मारतो
नाहीं कधीं लढणार आम्ही, शस्त्र हातीं घेउनी
जिंकूं परी शत्रूस, नुसत्या गोल साड्या नेसुनी !

२९

जोडतो मी हात " देवा ! स्वर्गीं मला नेऊं नका
सांभाळणें आहे तुम्हा जर उर्वशी अन् मेनका ! "

३०

' हेल्थ ' ( Health ) माझ्या प्रेयसीची खूप आहे चांगली
बेजार होतो जीव जर का, एकदां ती लाजली !

३१

रडलासि कां मग सांग, जेव्हां हरवली सीता तुझी
रडतां अम्ही, आम्हापुढें, फेकशी गीता तुझी ?

३२

येतो फिराया तुजसवें, ऐक जें सांगेन मी
नेसायचें नउवार तूं, अन् मागें तुझ्या चालेन मी !

३३

कंटाळले या चारुतेला, अगदीच बाई अलिकडे
पाहती नुसतेच मेले आ वासुनी माझ्याकडे !

३४

चंद्रमा हांसे नभीं, अन् शांत शीतल चांदणें
आहे कपाळीं आमुच्या पण अमृतांजन लावणें !

३५

गायिली आक्रंदुनी मी, दर्दिली ही शायरी
व्राहिल्या गालांवरूनी आंसवांच्याही सरी
इष्कांतली या बेवकूफी फक्त त्यांना समजली
हांसला मोत्या जरासा, चंपी जराशी हांसली !

३६

कींव त्याची ये मला, जीवनी ज्याच्या कधीं
आलीच नाही वेळ केव्हां " इश्श बाई !" ची कधीं !

३७

धारिष्ट्य हे केलेच नसतें, आम्ही कधींही एवढें
म्हणती जरा आधीच ती कां, " इश्श बाई ! " एवढें

३८

गेलो कराया धैर्य मी, तिज हात लावुन बघितलें
जाहली चाळीस वर्षे नाहीं तिनें मज सोडलें !

३९

सुजनता माझी मला ही निर्भत्सिते वरच्यावरी
मीही असा वस्ताद, तिजला चोरून करतो शायरी !

४०

सांगू नका आम्हांस तुमच्या मेनका अन् उर्वशा
विसळून घ्या तुमच्याच तुम्ही, या चहाच्या कपबशा !

इंद्रा ! अरे, तर हीच ना सौख्यें तुझ्या स्वर्गांतली ?
चाटल्या नाहीत बाबा, आम्ही कधी पत्रावळी !

४१

" रोखूं नको डोळे असे हे, " सांगतो तुज एकदां
पाहिल्या आहेत आम्ही चंप्या अशा कित्येकदां !

४२

पुरुषोत्तमा देवा ! अरे हें मर्दपण कुठलें तुझें ?
संपायचें आहे कधीं का वेड बुरख्याचें तुझें ?
असतास जर युवती कुणी, अन् असतास जर पड्यांत तूं
बघितले असते अम्हीहीं कुठवरी लपतास तूं !

४३

गेलो फिराया दूर, तेथें खूप आम्ही बोललो
टाळुनी बोलायचें तें खूप आम्ही बोललों

४४

आम्ही कुणा ना पाहिलें, कोणी अम्हां ना पाहिलें
ओशाळलो इतुके, जसे कीं साऱ्या जगानें पाहिलें !

मराठी ग्रंथसंग्रहालय
क्र. 92829

४५

दोघेच होतो; शक्य न्हतें येणें तिथें तिसरें कुणी
लाजवीला मी शिवाजी, गेलो तसे आलो अम्ही !

४६

आज नाहीं पण उद्या, येईन नक्की सांगते
कंटाळले सांगून अगदी रोज तुज हें सांगते !

४७

वृद्ध मी, नाहीं जरी निवृत्त झालो फारसा
सोडिल्या मी दोन गोष्टीं, कंगवा अन् आरसा !

४८

व्हायचे सारेंच झालें, उरलें न कांहीं व्हायचें
कळलेंच ना बाई, मला पण, केव्हां कसें लाजायचें !

४९

भारताची राजनीती समजण्याला लागते
षंढताही खूप, थोडी-थोडकी ना लागते
खूप केला यत्न आम्हीं आम्हांस नाही समजली
ना कळो आम्हास, आहे पुष्कळांना समजली !

५०

मृत्युची माझ्या वदंता, सर्वत्र जेव्हां पसरली !
घबराट इतुकी नर्क-लोकीं, केव्हांच नव्हती पसरली
प्रार्थिती देवास सारे, म्हणती, " अम्हाला वांचवा —
वांचवा आम्हास आणि पावित्र्य इथलें वांचवा ! "

५१

फणकारुनी माझ्याकडे ती पाठमोरी जाहली
काय सांगू कहर ? होती नऊवार साडी नेसली !

५२

तिरप्या तिच्या नजरेवरी, बेहद्द झालो खूष मी
आज पण कळलें मला, ती ऐसीच बघते नेहमी !

५३

मजनू ! अरे, थोडा जरा का धीर हा धरतास तूं
रडती तुझी लैलाच, आणि जन्मभर हंसतास तूं !
इतुकें खरे, इष्कांत कांहीं थोडे रडावें लागतें
वेड्या ! अरे, इष्कांत सारें खोटें रडावें लागतें !

# दा र्श नि क

१

एकटा मज पाहण्याला, शर्थ मी केली पुरी
दूर मी नेले मला, रानींवनीं, विजनी तरी
तेथेंहि नाही एकटा, द्वैत वासुनि ' आ ' उभें
नाशितां द्वैतास होतें, शून्य मज खाया उभें
कंटाळलो द्वैतास मी, मज धाक शून्याचा उरी
ना कळे जाऊं कुठे, दोन्हीकडे दिसते सुरी
शेवटीं संतापलो, अन् ब्रम्हांड ग्रासुनि बैसलो
द्वैत गेलें, शून्य गेलें, एकटा मी राहिलो !

२

अजवरी स्वप्नांत होतो, जाग आतां ये मला
जाग कसला ? हा, खरोखर जागही स्वप्नांतला !

३

' सारेंच आहे स्वप्न येथें, ' मानतों ' हे ' सत्य मी
हाय पण वेदान्तही हा, वाचला स्वप्नांत मी !

४

आहे जरी हें स्वप्न खोटें, हेच प्रिय मज वाटतें
काय सांगूं भय मनाला, जागृतीचें वाटतें !

५

सांगतां कीं सर्व खोटें, कांहींच ना येथें खरें
सर्व खोटें इतुकें तरी, आहेच ना येथें खरें ?

६

सांगसी निष्काम कर्मे, कृष्णा अरे वेदान्त तूं
समजला कीं काय आम्हा किर्लोस्करांचा पंप तूं ?
याचसाठीं आम्हासही, अवतार घ्यावा लागला
कृष्णा तुझ्या गीतेंत तूं हें भलतेच बोलूं लागला !

७

वैतागुनी या जीवनाला, अभ्यासिला वेदान्त मी
आणि समजूं लागलो की प्रत्यक्ष केवळ ब्रह्म मी
हाय ! माझे ब्रह्मही आता रडाया लागले,
कळले मला मी फक्त, माझे नांव नुसते बदलले !

८

बंधने मज-भोंवतीची, उकलोनिया मी पाहिलें
सांगतो कीं शेवटीं त्या, कांहींच नव्हते राहिलें
दचकलो, पाहून माझ्या, शून्यसम रूपा तशा
भोवतीं गुंडाळल्या मी चिंध्या पुन्हा होत्या तशा

९

जीवनाची रेलगाडी, ना कळे नेते कुठें
तिकिटावरी तर स्टेशनाचें, नांवही नाही कुठें
आहे कुणी ' टी. सी ' परी, हे ना कुणा समजायचे
फक्त जाणे एकटा तो, कोणा, कुठें उतरायचें
फेकतो वाटेल त्याला, उचलुनी खिडकींतुनी
सांगती की, खूप आहे, संवय त्याची ही जुनी

फेकण्या मजला जसा तो, सरसावला थोडा पुढें
देहात्मतेचा कोट नुसता, मी फेकला त्याच्यापुढें
उचलला तो कोट त्याने, फेकला खिडकीतुनी
केला मला 'आदाब' आणि अदृश्य झाला लाजुनी
रेलही अदृश्य झाली, जे वाचले तें वाचले
तिकिटावरी मी शब्द नुसते, 'निर्वाण' इतुके वाचले !

१०

जे दिसे प्रत्यक्ष तेही, आहे जरी खोटें असे
अदृश्य त्या देवास सांगा, सत्य मी मानू कसें ?
आहे जरी साराच भ्रम हा, काय हा आहे कमी ?
यापुढें जाऊन दुसरा कां करूं निर्माण मी ?

११

'आज' माझें नांव आहे, आहे उद्याचा 'काल' मी
कालचा आहे 'उद्या', ना मी 'उद्या' ना 'काल' मी
'आज' माझें नांव आहे मी वर्तमानीं राहतो
भूत, भावी शब्द तुमचे ऐकून गालीं हांसतो
आहे जसें आस्मान आहे निष्कंप मी सांगू किती
फिरविला मज व्यर्थ, म्हणतां कालचक्राची गति
जाणतो कीं व्यर्थ आहे माझें तुम्हा समजाविणें
इतुकेंच आहे ज्ञान तुमचें, भलत्यास भलतें समजणें !

१२

गालिब ! अरे, अमुच्याहि दारीं, आहेच कीर्ती यायची
फक्त आहे देर थोडी, मरणास अमुच्या यायची
येणार ना अमुच्या पुढें ती, प्राण असती तोंवरी
कीर्तिप्रिया माझी अरे ! ही भलतीच आहे लाजरी !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 32034 वि. ४।०५
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे दा. क्र. 92629

REFBK-0012721

REFBK-0012721